# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

**Maharashtra Prathamik Shikshan Parishad**
(Govt. of Maharashtra Undertaking)


जा. क्र. मप्राशिप/सशिअ/शिक्षक अनुदान/२०१७-१८/९३६७ दिनांक : 21 JUN 2017

**विषय: सन २०१७-१८ मध्ये शिक्षक अनुदानाच्या विनियोगाबाबत.**

सन २०१७-१८ मध्ये सर्व शिक्षा अभियानांतर्गत शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी अनुदानित संस्थांच्या प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमधील शिक्षकांसाठी दिनांक ०९/०२/२०१७ रोजीच्या भारत सरकारच्या प्रकल्प मान्यता मंडळाच्या बैठकीतील इतिवृत्तात तरतूद मंजूर झाली आहे. मंजूर शिक्षक अनुदान शाळा व्यवस्थापन समितीच्या खात्यावर दिनांक १५ जुलै, २०१७ अखेरपर्यंत वर्ग करण्यात यावे. सर्व शिक्षा अभियान अंमलबजावणी आराखडा व Manual on Financial Management & Procurement मधील मुद्दा क्र. ३१.१ ते ३१.४ प्रमाणे अनुदान विनियोगाची कार्यवाही करण्यात यावी.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत एप्रिल-२०१७ पर्यंत १०० टक्के मुले प्रगत होण्याचे उद्दिष्ट निर्धारित केले आहे. तथापि, माहे एप्रिल-२०१७ अखेरपर्यंत फक्त ४१,००० शाळा प्रगत झाल्याचे दिसून येते. यावरून निर्धारित उद्दिष्ट साध्य करण्यात अद्याप पूर्णत: यश प्राप्त झालेले नाही. मुलांना वाचन आल्याशिवाय लेखन जमणार नाही हे विविध शैक्षणिक सर्वेक्षणावरून दिसून येते. तसेच गणितामधील मुलभूत संकल्पना दृढीकरणासाठी पायाभूत कौशल्य विकसित करणे गरजेचे आहे. या विषयातील संकल्पना दृढीकरणासाठी व मुलांना त्यातून आनंद मिळण्यासाठी भरपूर शैक्षणिक साहित्य वर्गामध्ये उपलब्ध असावयास हवे.

सन २०१७-१८ मध्ये प्रत्येक मुलाला वाचन, लेखन व गणितातील मुलभूत क्रिया अवगत व्हाव्यात यासाठी महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे यांनी भाषा व गणित या विषयातील विविध संकल्पनांवर आधारित साहित्य विकसित केले आहे. तसेच सदर साहित्य अध्ययन-अध्यापनात प्रभावीपणे वापरण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षणही देण्यात येणार आहे. सदरचे प्रशिक्षण गणित व भाषा विषयाशी संबंधित विविध संकल्पनांवर कृतीयुक्त असणार आहे. त्यामुळे प्रशिक्षणामध्ये आवश्यक पूरक शैक्षणिक साहित्याची उपलब्धता करण्यासाठी शिक्षकांना या अनुदानाचा उपयोग करता येईल.

सर्व शिक्षा अभियान
सारे शिकूया, पुढे जाऊया


Jawahar Bal Bhavan, Netaji Subhash Marg, Charni Road, Mumbai - 400 004.
Tel. : 022-236 36 314, 236 79 267 Fax : 022-236 36 315 Email : mpspmah@vsnl.com, mpspmah@gmail.com

प्रगत वर्ग व शाळा करण्यासाठी आवश्यक पूरक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करण्यासाठी या अनुदानाचा विनियोग करता येईल.

मुलांच्या शिकण्याशी संबंधित नाविन्यपूर्ण उपक्रम, सर्जनशील कार्यक्रम ज्याचा मुलांच्या शिकण्याशी संबंध व त्यातून परिणाम प्राप्त झाला आहे अशा बाबींशी संबंधित यशोगाथा त्यामध्ये केस स्टडीज्, व्हिडीओज्, Testimonials, इत्यादी उल्लेखनीय बाबींचे मराठी व इंग्रजीमध्ये दस्ताऐवजीकरण (Documentation) करून या कार्यालयास सादर करावे. जेणेकरून ते भारत सरकारच्या SSA Shagun या पोर्टलवर अपलोड करण्यासाठी सादर करण्यात येईल.

जिल्हा परिषद व महानगरपालिकांसाठी मंजूर भौतिक लक्ष्य व आर्थिक तरतूद वित्तीय अंदाजपत्रकामध्ये नमूद केली आहे. संयुक्त आढावा पथकाच्या सूचनांच्या अनुषंगाने, अनुदान विनियोगाबाबतचा तपशिल शालेय फलकावर प्रदर्शित (Display) करण्यात यावा.

(नंद कुमार भा.प्र.से.)
**राज्य प्रकल्प संचालक,**
**म.प्रा.शि.प., मुंबई.**

**प्रति,**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
२) आयुक्त, महानगरपालिका (सर्व).

**प्रत : माहितीस्तव,**

१) मा. मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
२) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव,**

१) आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.
५) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
६) प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, सर्व जिल्हे.
७) शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व).
८) शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी, महानगरपालिका (सर्व).